




# क्रांतीपर्व

## लोकशाहीप्रधान देशाची वाटचाल


प्रा. अमर जावळे

प्रा. भूषण काटे - पाटील



LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS



Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | पंतप्रधान इंदिराजी: आणीबाणी व वृत्तपत्रावरील सेन्सोरशिप | १ |
| २ | सरदार वल्लभभाई पटेल आणि राजस्थान | १२ |
| ३ | इंदिरा पर्वातील राष्ट्रीय आणीबाणी - एक अभ्यास | १६ |
| ४ | स्व.इंदिरा गांधीच्या छत्रछायेतील काही वर्ष | २३ |
| ५ | **संस्थान के विलीनीकरण मे सरदार वल्लभभाई पटेल कि भूमिका** | २८ |
| ६ | **स्व.इंदिराजी गांधी यांच्या कारकीर्दिमधून नेतृत्व विकासाचे धडे** | ३३ |
| ७ | संस्थानिकांच्या विलिनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | ३८ |
| ८ | Vallabhbhai Jhaverbhai Patel and Faizpur Congress १९३६ | ४२ |
| ९ | सरदार वल्लभभाई पटेल : एक उत्तम प्रशासक | ५४ |
| १० | स्वर्गीय इंदिरा गांधी :: एक कणखर महिला नेतृत्व | ५८ |
| ११ | भारतीय राजनिती का चमकता तारा :- इंदिरा गांधी | ६१ |
| १२ | भारताच्या आर्थिक विकासातील इंदिरा गांधीचे योगदान | ६४ |
| १३ | **श्रीमती इंदिरा गांधी यांचे परराष्ट्रीय धोरण व भारतीय सुरक्षा** | ७० |
| १४ | लोह पुरूष आणि लेडी सरदार | ७४ |
| १५ | देशप्रेमी प्रियदर्शनी इंदिरा | ७८ |
| १६ | अखंडीत भारताचे प्रेणेते :- सरदार वल्लभभाई पटेल | ८० |
| १७ | इंदिरा गांधी - एक कार्यकाल नेतृत्व | ८३ |
| १८ | भारतातील ग्रामिण वित्तीय व्यवस्थेत इंदिरागांधी यांचे योगदान | ८४ |
| १९ | इंदीरागांधी समग्र विचार : आधुनिक काळाची गरज | ९१ |
| २० | भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान एक कणखर नेत्या - श्रीमती इंदीरा गांधी | ९५ |
| २१ | आणीबाणी "विरोधकांची" | ९९ |


Scanned by CamScanner

# भारताच्या आर्थिक विकासातील इंदिरा गांधीचे योगदान

प्रा.डॉ.वसंत नानाराव पतंगे (अर्थशास्त्र विभाग)
अ.र.भा.गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी .

प्रस्तावना :-

कणाकणाने ज्योत जळाली, उजळीत तेजोधन ।
ज्यास द्यावा शितलतेपन, झिजले हे चंदन ।।

भारताच्या वैविध्यपूर्ण अशा देशाला इंग्रजांच्या गुलामगीरी तून मुक्तता मिळाली आणि देशातील बेकारी, महागाई, जातीयवाद,प्रादेशिक वाद, शेजारील राष्ट्रांची भारतावरील वक्रदृष्टी अशा अनेक समस्या भारताच्या स्वातंत्र्याचे स्वागत करण्यासाठी उभ्या होत्या.या समस्या सोडवून भारताला विकास साधावयाचा होता. याची सर्वस्वी जबाबदारी भारताचे पहिले पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरु व त्यांच्या सहका-यांवर होती. पं. जवाहरलाला नेहरुंच्या निधनानंतर लालाबहादूर शास्त्री व नंतर दिर्घकाळ ती जबाबदारी इंदिरा गांधी वर आली. त्यांनी आपल्या कार्यकाळात ज्या धडाडीने कार्य केले व निर्णय घेतले त्यामुळे अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या गौरव दुर्गा असा केला होता. भारताच्या इतिहासात पंतप्रधानपदी विराजमान होणा-या त्या एकमेव भारतीय महिला असून त्यांची कारकीर्द दैदीप्यमान अशी होती.इंदिरा गांधीच्याच काळात बँकांचे राष्ट्रीयकरण, हरितक्रांती , भरताचे लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी व स्वसंरक्षणासठी पोखरणचा अणूस्फोट, ऑपरेशन ब्ल्यू स्टार, बांगलादेशाची निर्मिती, गरीबी दुर करण्यासाठी वीस कलमी कार्यक्रम व वादग्रस्त अशी आणिबाणि इ. घटना त्यांच्या कार्यकाळात घडल्या व त्यांची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली आणि जागतीक स्तरावर भारताचे महत्व वाढू लागले.

## इंदिरा गांधीचे बालपण , शिक्षण व राजकारण प्रदेश :-

इंदिरागांधी यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी अलाहाबाद येथे कमला नेहरु व पं. जवाहरलाल नेहरु या दांम्पत्याच्या पोटी झाला. जन्मता:च त्यांना उत्तम विचारांचे बाळकडू मिळाले .स्वदेशी व स्वदेश प्रेम त्यांच्या मनात लहानपणापासूनच निर्माण झाले. इंग्रजांविरुध्दचा लढा त्यांनी अगदी जवळून अनुभवला त्यातूनच त्यांनी विदेशी विरुध्द लढ्यात सहभाग घेतला.या लढ्याबरोबरच त्यांनी शिक्षणही सुरु ठेवले. इलाहाबाद , पूणे व शांती निकेतन असा त्यांचा शिक्षणाचा प्रवास सुरु होता. शांतीनिकेतन मधल्या वातावरणामुळे त्या भारावून गेल्या व त्या वातावरणातच ख-या अर्थाने इंदिराजी विशाल बनल्या.त्यांनी आपल्या कष्ट व जिद्दीच्या जोरावर विविध कला आत्मसात केल्या त्या कलांचे कौतूक रविंद्रनाथ टागोरांनीही केले.त्यानंतर त्या शिक्षणासाठी जगप्रसिध्द अशा ऑक्सफर्ड विद्यापीठात दाखल झाल्या.आपला देश ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त व्हावा अशी



Scanned by CamScanner

प्रबळ इच्छा इंदिराजींची होती.स्वातंत्र्य आंदोलनात इंदिरा गांधीचा सक्रिय सहभाग होता. इंदिरा गांधींच्या विचारांवर रशियाचा प्रभाव होता.नंतर अमेरिकेशीही त्यांनी जुळवून घेतले. इंदिरा गांधींनी वयाच्या २१ व्या वर्षी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला त्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून १९५९ मध्ये निवडून आल्या. १९६४ साली त्यांचा केंद्रिय मंत्रीमंडळात समावेश करण्यात आला. माहिती व नभोवाणी मंत्री म्हणून त्यांनी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या कार्यकाळात कार्य केले.लालबहादूर शास्त्री यांचा १९६६ मध्ये संशयास्पद मृत्यु झाला व इंदिरा गांधी मोरारजी देसाई यांचा पराभव करुन पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून विजयी झाल्या. आणिबाणी सारख्या वादग्रस्त निर्णय वगळता इंदिरा गांधीची कारकीर्द भारताला एक नव्या उंचीवर नेणारी ठरली. हे मात्र वास्तव आहे.

**भारताच्या आर्थिक विकासातील योगदान :-**

भारतासाठी १९६० व १९७० ची दशके अत्यंत वेदनादायी ठरली. शासनाच्या आर्थिक धोरणांमुळे खाजगी उद्योगांना पायबंद बसला त्यामुळे बेकारीत झपाट्याने वाढ झाली. समाजवादी अर्थव्यवस्थेतील किंमत नियंत्रणामुळे भारतात काळाबाजार फोफावला सोन्याच्या भारतीय प्रेमापाटी काळा बाजार अधिकच भडकला त्यातच कृषी उत्पादन घटून अन्नधान्याच्या किमती गगनाला भिडल्या अशा या नैराश्याच्या वातावरणात इंदिरा गांधीनी सत्ता आपल्या हाती घेतली आणि कल्याणकारी धोरणे राबवायला सुरुवात केली.

**हरित क्रांती :-**

भारतीय अर्थव्यवस्था कृषी प्रधान असुनही अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नव्हता. अन्नधान्याची मोठी टंचाई भारतात होती. या काळात अमेरिकेने भारताच्या मागणीला प्रतिसाद देत पी.एल.४८० या कार्यक्रमाअंतर्गत अन्नधान्याची मदत पूरविण्याचे आश्वासन दिले पण त्यांनी अतिशय जाचक अटी टाकल्यामुळे त्या अटी स्वीकारणे शक्य नव्हते म्हणून अमेरिकेची मदत लांबली . अन्नधान्याच्या उपलब्धते अभावी देशात अराजकता निर्माण होण्याची भीती होती व बाहेरील देश अन्नधान्याच्या बदल्यात स्वता:ची धोरणे भारतात राबवू पहात होती. अन्नधान्याच्या स्वावलंबणाशिवाय भारताचा विकास शक्य नाही. हे पंडीत जवाहरलाल नेहरु व दंदिरा गांधीनी हेरले होते. म्हणूनच हरितक्रातीला पं.जवाहरलाल नेहरुच्याच काळात सधन जिल्हा कार्यक्रमाअंतर्गत सुरुवात झाली होती. इंदिरा गांधीनी पुढे त्यांच्या काळात हरितक्रांतीला गती दिली व याचा परिणाम म्हणजे ओलीता खालील क्षेत्र दुपटी पेक्षाही जास्त वाढले . अन्नधान्याच्या उत्पादनात वेगाने वाढ झाली. धान्य उत्पादनात ७२ दशलक्ष टनावरुन १४५ दशलक्ष टनापर्यंत वाढले. तेलबियांचे उत्पादन देशाच्या एकुण गरजेच्या ७० टक्क्यांपर्यंत वाढले. व देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. भारतात हरितक्रांतीमुळे अन्नधान्याचे परावलंबीत्व कमी झाले. त्यामुळे विकास योजना रावणे शक्य झाले. तसेच हरितक्रांतीमुळे शेतीला एक वेगळा आयाम मिळवून दिला. शेती स्वरुप उदरनिर्वाहाकडून व्यापारी बनले. शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ झाली. शेतीशी संबंधीत उद्योगांचा विकास झाला.

**बँकांचे राष्ट्रीयकरण:-**

भारतातील बँकांचे राष्ट्रीयकरणाला अनेक तज्ञांनी विकासाच्या दृष्टीने मैलाचा दगड मानले आहे. कारण प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये बँकांची भूमिका महत्वाची असते हे ओळखूनच भारतात बँकांचे



Scanned by CamScanner

राष्ट्रीयकरण झाले. भारतात ब्रिट्रीश सत्तेचा काळात श्रीमंत लोक व संस्थानिकांनी आपल्या भागातील उद्योगांना व व्यापाराला पैसा उपलब्ध होईल या हेतूने बँका सुरु केल्या होत्या. या बँका श्रीमंत आणि विशिष्ट वर्गातील लोकांनाच कर्जपूरवठा करु लागल्या सर्वसामान्य जनता या बँकापासून वंचित होती. शेतक-यांना व उत्पन्न कमी असणा-या वर्गाला या बँका कर्ज देत नव्हत्या त्यामुळे शेतकरी व कमी उत्पन्न गटातील लोकांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत असे . हे सावकार त्यांच्या कडून भरमसाठ व्याज वसूल करायचे व कर्ज आवश्यकतेपेक्षा कमी घ्यायचे विशेष म्हणजे शेतकरी व ग्रामिण भागातील लोकसंख्येचे प्रमाण भारतात जास्त होते. त्यांच्या दृष्टीने बँकींग सेवा लवकर उपलब्ध करुन देण्याच्या हेतून बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. विविध देशातील बँकांनी त्यांच्या देशाच्या आर्थिक विकासातील आपले योदान मोलाचे असल्याचे दर्शवून दिले होते. तसेच बँकाच्या मार्फत रोजगार निर्मिती ही मोठ्या प्रमाणात होणर होती . इंदिरा गांधींनी बँकाच्या राष्ट्रीयकरणाच्या संदर्भात म्टले की, बँकांच्या कर्जापासून भारतातील मोठे क्षेत्र दुर्लक्षित राहीले आहे. लघुउद्योग, निर्यात उद्योग बँकांना व्यावसायीकतेची जोड मिळावी , नविन उद्योगांना प्रोत्साहन द्यावे . तसेच बँकांवरील मोजक्या लोकांचे नियंत्रण रद्द व्हावे या उद्देशाने बँकाचे राष्ट्रीयकरण करण्यात आले.

बँकांच्या राष्ट्रीयकरणामुळे कर्जवाटपाची पूनर्रचना होउन दुर्लक्षित घटकांना कर्ज उवलब्ध होऊ लागले. शेतीलाही कर्जपुरवठा होऊ लागला. बँकांच्या शाखांचा विस्तार झपाट्याने झाला. प्राथमिक क्षेत्राला कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध होऊ लागले. बँका सार्वजनिक क्षेत्रात आल्यामुळे लोकांचा विश्वास वाढून बँकांची कार्यक्षमता वाढली. बँकांच्याव्यवसायात वाढ झाल्याने खर्चात बचत होऊ लागली. बँक व्यवस्थापनासाठी सरकारने तज्ञांची नेमणूक केली व सरकार अर्थव्यवस्थेच्या अनुरुप बँकिंग विषयक धोरण ठरवू लागले. बँकांची नफेखोरी कमी झाली.बँका आपल्या ठेवीतून पत पैसा निर्माण करतात. त्यावर आता आर.बी.आय.च्या माध्यमातून शासन नियंत्रण ठेवू लागले. खाजगी बँका नव्याने प्रेरीत होत्या मात्र बँकांचे राष्ट्रीयकरण झाल्यामुळे त्या सामाजिक बांधीलकीतून कार्य करु लागल्या तसेच खाजगी बँकामुळे आर्थिक केंद्रीकरण झाले होते ते सार्वजनिक बँकामुळे विकेंद्रीत झाले. सार्वजनिक क्षेत्राला सहजतेने कर्ज पुरवठाउपलब्ध झाला व आर्थिक विकासाला गती मिळाली व प्रादेशीक समतोलसाधता आला बम्ंकेतील लोकांचे व्यवहार वाढून सहभाग वाढला. नियोजन आयोगाने सुचविलेल्या विकासकामांना सहजतेने कर्ज उपलब्ध होउन विकासची गती वाढली.

बँकांचे राष्ट्रीयकरण करतांना इंदिरा गांधींना मोठा विरोध झाला त्या विरोधाला न जूमानता त्यांनी देश हीत लक्षात घेवून १९ जुलै १९६९ ला देशातील सर्वात मोठ्या १४ बँकांच्या राष्ट्रीय करणाचा अध्यादेश काढला व बँकां राष्ट्र सेवेत दाखल झाल्या.दुस-या टप्प्यात १९८० मध्ये आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले.

**पंचवार्षिक योजना:-**

भारतात स्वातंत्र्यानंतर नियोजन आयोगाच्या माध्यमातून नियोजनबध्द विकास करण्या साठी पंचवार्षिक योनांना सुरुवात झाली.इंदिरा गांधीनी १९६६ ते १९८४ या आपल्या पंतप्रधान पदाच्या काळात सर्वाधिक ४ पंचवार्षिक योजनांचे अध्यक्षपद भूषविले. (जनता सरकारचा काळ वगळता) या सर्वच पंचवार्षिक योजनांच्या काळात भारतावर पाकिस्तान व चिन युध्दामुळे संकटे आली. त्या व पक्षांतर्गत संकटावरही इंदिरा गांधींनी मात करुन या योजना यशस्वी पणे राबविल्या. विशेषत: पाचव्या पंचवार्षिक योजनत गरिबी निर्मुलनाचे



Scanned by CamScanner

प्रमुख उदिष्ट होते.सामाजिक न्यायासह आर्थिक विकास हे या योजनेचे घोषवाक्य होते. गरीबी निर्मुलनाबरोबरच आर्थिक आत्मनिर्भरता ,स्वावलंबन ही प्रमुख वैशिष्टे या योजनेची होती या योजना काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर पेट्रोलियम पदार्थांच्या किंमत वाढीच्या मोठ्या धक्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था खिळखिळी झाली तरीही इंदिरा गांधींनी ही योजना यशस्वीपणे राबवली याच योजनच्या काळात वीस कलमी कार्यक्रम राबविण्यात आला त्यात वेठबिगारी नष्ट करणे ,शेतकरी व भूमीहीनांना खाजगी कर्ज माफ करणे, शेतमजुरांचे किमान वेतन वाढवणे ,जीवनावश्यक वस्तुंच्या किमती कमी करणे , कर चुकवेगिरीवर कठोर निर्बंध , चोरट्या आयातीला पायबंध उत्पादन व उत्पादकता वाढविणे कमाल जमीन धारण कायद्याची अमलबजावणी इ.कार्यक्रम वीस कलमी योजनांत राबविण्यात आले.या वीस कलमी योजनांची अमलबजावणी निष्ठुर पणे झाल्यामुळे जनतेच्या मनात या विषयी असंतोष निर्माण झाला.व देशात ही योजना चांगली असुनही नाचक्की झाली. मात्र तरीही पाचव्या पंचवार्षिक योजनेत यशस्वी झाली असे म्हणता येईल. इंदिरागांधीनी देशांर्गत व सिमेवर अशांतता असतांनाही लोककल्याणकारी योजनांचा धडाका कायम ठेवला म्हणूनच जनमानसात त्यांची प्रतीमा उंचावली.

**आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरण :-**

बँकांचे राष्ट्रीय करण संस्थानिकांचे विशेषाधिकार रद्द कमाल जमीन धारण कायदा विमा व्यवसायाचे व इतर उद्योगांचे राष्ट्रीयकरण करुन इंदिराजींनी देशांतर्गत तर आपल्या कर्तृत्वाची छाप पाडलीच होती शिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्यांन ी आपली श्रेष्ठत्व सिध्द केले. इंदिरागांधींनी जागतिक बँकेच्या आर्थिक मदतीच्या बदल्यात आपली अर्थव्यवस्था काही प्रमाणात खुली करुन काही महत्वाच्या सुधारणा लागु केल्या.रुपयाचे अवमुल्यन करुन विनिमय दर निम्याहुन खाली आला. खाजगी क्षेत्रावरील निर्बध कमी केले अमेरिकेच्या पी.एल.४८० अंतर्गत असणा-या काही अटी नाकारुन अमेरिकेच्या मनमानी अटींना निर्बंध घातले. रुपयाच्या अवमुल्यानामुळे मार्ग फारसा लाभ भारताला झाला नाही.अमेरिका , व्हिएतनाम युध्दात भारताने अमेरिकेची बाजु धरावी.असे अमेरिकेला वाटत होते.पण इंदिराजींनी व्हिएतनाची बाजु घेवून आपले परखड मत मांडून भारताची एक वेगळी प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झाली.

अलिप्ततावादी राष्ट्र संघटना मजबुत करण्याठी इंदिरागांधींनी मोठे योगदान दिले.यासाठी दिल्लीत अलिप्ततावादी राष्ट्रांच्या परिषदेचे आयोजन करुन अमेरिकेचा हस्तक्षेप कमी केला त्यामुळे अलिप्त राष्ट्रसंघामध्ये भारताचे महत्व वाढले व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या मताची दखल घेतली जावू लागली अलिप्ततावादी राष्ट्रांमध्ये इंदिरा गांधीनी राजनितीक सहकार्य व आर्थिक सहायता वाढविण्यावर भर दिला इंदिराजींनी अलिप्ततावादी व विकसनशील देशांच्या ख-या पूरस्कर्त्या होत्या.हे अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी ही मान्य केले होते. कारण रशियाची मैत्री इंदिराजींमुळे दृढ झाली होती .जगातील तटस्थ राष्ट्रांच्या गटाच्या अध्यक्षपदी १९८३ मध्ये इंदिराजींची बिनविरोध निवड झाली ही त्यांच्या आंतरराष्ट्रीय धोरणांची फलश्रुती होती. भारत आफ्रो -आशियाई देशांमध्ये मैत्री व सलोख्याचे संबंध इंदिराजींनी प्रस्थापीत केले यातून या देशांसोबतच्या भारताच्या व्यापारात वाढ झाली व भारत हा मैत्रीसाठी विश्वासाहार्य देश असल्याचे जगाने मान्य केले .यातून सर्व जगाचे लक्ष भारताने आपल्याकडे आकर्षित केले.म्हणूनच ख-या अर्थाने भारताच्या



Scanned by CamScanner

आधुनिक आंतरराष्ट्रीय धोरणाच्या जनक इंदिरा गांधी होत्या असे म्हणणे संयुक्तीक ठरेल. बांगलादेशची निर्मिती ही इंदिरा गांधींच्या मुत्सदेगीरीचे उत्तम उदाहरण होय.

**अखंड भारताच्या पुरस्कर्त्या :-**

इंदिरा गांधी या अखंड भारताच्या पुरस्कर्त्या होत्या. भारताने बांगलादेश निर्मितीला पाठिंबा दिल्यानंतर व बांग्लादेशाच्या निर्मितीनंतर अमेरिका व पाकीस्थानच्या मीत्र राष्ट्रांनी भारतातील प्रादेशिकवादाला प्रोत्साहन दिले पण हे वाद इंदिराजींनी मोडून काढले. पंजाबात खिखांनी स्वतंत्र खलिस्थानची मागणी केली. व पंजाब मधील दहशतवादी कारवायांमुळे भारताच्या एकक्याला धोका निर्माण झाला या दहशतवादाचा ऑपरेशन ब्लु स्टारव्दारे बीमोड केला व राष्ट्रऐक्य अबाधित राहीले. पाकिस्थान आक्रमण त्यांनी यशस्वी पणे हाताळले. व दोन्ही देशात सिमला करार घडवून आणला जगातील इतर मोठ्या देशांवर अवलंबुन न राहता प्रत्येक क्षेत्रात आपण स्वंयसिध्द असले पाहिजे अशी इंदिराजींची ठाम भूमिका होती.त्यातूनच त्यांनी राज्यस्थानातील पोखरण येथे १८ मे १९७४ रोजी अणू चाचणी घेवून शेजारील देशांना व जगा ला योग्य संदेश दिला व या आण्विक शक्तिचा उपयोग देशाच्या विकासात्मक कार्यासाठी केला जाईल अशी ग्वाही त्यांनी जगाला दिली व आण्विक स्फोट हा युध्दासाठी नव्हे तर रचनात्मक कार्यासाठीही असतो.हे जगाला पटवून दिले. कोणतेही तंत्रज्ञान , शक्ती, वाईट नसते.त्याचा वापर तो देश कसा करतो. त्यावर हे अवलंबुन असते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन त्यांनी भारत कोणत्याही बाबतीत कमी नाही हे जगाला दाखवून दिले.

**भारतातील आणिबाणी :-**

भारतातील आणिबाणी हा देशाच्या इतिहासातील काळा कालखंड होता असे मानले जाते.दि. २५ जुन १९७५ रोजी देशाच्या इतिहासातील दु:खद घटना म्हणजे आणिबाणी जाहीर करण्यात आली. पेट्रोलियम पदार्थांच्या वाढत्या किंमती, काळाबाजार, पाकिस्थान युध्द, जनतेचा संप व टाळेबंदी , पक्षांतर्गत बंडाळी आणि बिघडू लागलेली देशाची अर्थव्यवस्था या सर्व समस्या सोडवण्यासाठी इंदिराजींनी आपल्या विश्वासू सहका-यांना विश्वासात घेवून आणिबाणी जाहीर केली.यात लोकसंख्या नियंत्रणासाठीची निर्बीजीकरण पध्दती ज्या पध्दतीने राबविली व आणिबाणी ज्या निष्ठूरतेने राबविली त्यामुळे त्या टिकेच्या धनी बनल्या.आणिबाणीने मुलभूत अधिकारांवर गदा आली.वृत्तपत्रांवर निर्बंध लादले. विरोधी पक्ष नेते , तस्कर, साठीबाजी समाजकंटक अशा एक लाख लोकांना अटक करण्यात आले. आणिबाणीच्या आवश्यकतेचे इंदिरा गांधींनी समर्थन केले पण ती ज्या पध्दतीने हाताळली ती भारतासारख्या लोकशाही संपन्न देशात जनतेच्या पचनी पडली नाही. आणि ही आणिबाणी इंदिराजींच्या यशस्वी कारकिर्दीवर डाग ठेवून गेली.

**समारोप :-**

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील विकासाला गतीमान करण्याचे कार्य इंदिराजींनी केले.निश्चीत उदिष्ट्ये गाठण्यासाठी परिश्रमाशिवाय पर्याय नाही.हे आपल्या आचरणातून दाखवून दिले. १९६६ ते १९८४ या आपल्या कार्यकाळात अर्थकारण , राजकारण, आंतरराष्ट्रीय धोरण, संरक्षण, बँका व उद्योगांचे राष्ट्रीयकरण , अणूचाचणी, हरितक्रांती, आधुनिक तत्रज्ञान ,अवकाश संशोधन इ.सर्वच क्षेत्रात भारताने सर्वांगीण विकास साधला. शेजारील राष्ट्रांना किंवा इतर देशांना कधीच आपल्या देशांतर्गत हस्तक्षेप करु दिला नाही.अनेक



Scanned by CamScanner

समस्या समोर असतांनाही त्यावर मात करुन इंदिरा गांधींनी पंतप्रधान म्हणून भारताला व जगालाही एक सशक्त नेतृत्व दिले व पुरुषांची या क्षेत्रातील मक्तेदारी मोडीत काढली.

**संदर्भ ग्रंथ :-**


१. स्वातंत्र्योत्तर भारत , दुर शिक्षण केंद्र , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२. इंदिरा गांधी: एक वादळी पर्व- माधव गोडबोले
३. दृष्टीआडच्या इंदिरा गांधी - (लेखक -डॉ.के.पी.माधूर) अनुवादक -सुजाता गोडबोले, राजहंस प्रकाशन, पुणे
४. समाजवादी अर्थव्यवस्थेकडे जाण्यासाठी बँकाचे राष्ट्रीयकरण(महाराष्ट्र टाइम्स) -डॉ.विनायक गोविलकर
५. The Politics of bank Nationalization- १९६९-७६
६. Imagining India ज Nandan Nilker
७. The Economic Times
८. दै.महाराष्ट्र टाईम्स्, लोकसत्ता, सकाळ, लोकमत
९. निकी पेडीया




Scanned by CamScanner

# संपादक परिचय



## प्रा. अमर वसंत जावळे

12 वर्षे अ. र. भा. गरुड महाविद्यालय येथे अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन

समन्वयक : सरदार वल्लभभाई अध्यापन व संशोधन केंद्र

जिल्हा समन्वयक : विद्यार्थी कल्याण विभाग उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ जळगाव.

संशोधन : लघु संशोधन प्रकल्प (युजीसी) पुर्ण, पी.एच.डी. संशोधन सुरू आहे. विविध विषयांवर शोध निबंध प्रकाशित, कार्यशाळा, चर्चासत्रांमध्ये सहभाग

पुरस्कार : उत्कृष्ट रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी पुरस्कार

संपादन : लोकसेवक



## प्रा. भूषण  ज्ञानदेव पाटील

10 वर्षापासून अ. र. भा. गरुड महाविद्यालय येथे मराठी विषयाचे अध्यापन

समन्वयक : इंदिरा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र

संशोधन : पी.एच.डी. संशोधन कार्य अंतिम टप्प्यात, लघु संशोधन प्रकल्प (युजीसी) पुर्ण, विविध विषयांवर शोध निबंध प्रकाशित राष्ट्रीय परिषद समन्वयक

संपादन : लोकसेवक

लेखन : महानाट्य – सह्याद्रीची सिंहगर्जना,
1 लघुपट,
1 चित्रपट पटकथालेखन, दिग्दर्शन,
3 गीतांचे ध्वनीमुद्रण, दोन गीतांचा प्रायोगिक चित्रपटांमध्ये समावेश.

ISBN 978-0-359-01299-2
90000
9 780359 012992

Printed by
LAXMI
BOOK PUBLICATION, Solapur
Ph.: 0217-2372010 / +91-9595-359-435
Email.: apiguide2014@gmail.com
ayisrj2011@gmail.com
Website.: lbp.world

Published by
Lulu.com
3101, Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

Scanned by CamScanner